सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : १२५ | रविवार, दि. २५ जानेवारी २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

आजचे अभीष्टचिंतन



प्रा.डॉ.श्री.शशिकांत सोनवणे
प्रताप महाविद्यालय



श्री. विवेक अहिरराव
पत्रकार



सौ. मिना क्षीरसागर
शिक्षिका



श्री. अमोल पाटील
माजी नगरसेवक



श्री. मनोज जिवनानी
कापड व्यापारी

## राष्ट्रीय खाद्यतेल अभियान

# तेलाचा घाणा टाकल्यास दहा लाखांचे अनुदान

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : केंद्र सरकारच्या राष्ट्रीय खाद्यतेल अभियान तेलबियांतर्गत शेतकऱ्यांना थेट आर्थिक मदत मिळणार आहे. तेलबिया प्रक्रिया युनिट, प्लांट, तेलघाणा आणि गोदामांसाठी प्रकल्पाच्या खर्चाच्या ३३ टक्के किंवा जास्तीत जास्त ९. ९० लाख रुपयांपर्यंत अर्थसाहाय्य दिले जाणार असल्याने याचा मोठा दिलासा शेतकऱ्यांना मिळणार आहे.

शेतीला जोडधंदा म्हणून अन्य उद्योगधंदे उभारण्यासाठी कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना अनुदान उपलब्ध करून दिले जाते. राष्ट्रीय अभियानांतर्गत प्रक्रिया खाद्यतेल तेलबिया उद्योगासाठीही अनुदानाची तरतूद आहे. यापूर्वी केवळ शेतकरी गट किंवा संस्थांना काढणीपश्चात पायाभूत सुविधांचा लाभ मिळत होता. आता हे प्रोत्साहन अनुदान थेट वैयक्तिक शेतकऱ्यांनाही उपलब्ध करून दिले जाणार आहे. त्यामुळे तेलबियांच्या पेरणी क्षेत्रात वाढ होण्यासही मदत होणार आहे. जिल्ह्यात याबाबत



सध्या जनजागृती सुरु आहे.

**अर्ज कसा करावा?**

शेतकऱ्यांना या योजनेंतर्गत लाभ घेण्यासाठी अर्ज ऑनलाइन करता येतो. अर्जासाठी शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर नोंदणी करावी लागते. जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी यासाठी नोंदणी केली असून लाभाची प्रतिक्षा आहे. योजनेत आता वैयक्तिक शेतकऱ्यांचाही समावेश

**ही कागदपत्रे लागणार**

अर्जासाठी शेतकऱ्यांनी ओळखपत्र (आधार/ पॅन), जमिनीची माहिती, बँक खाते, शेतकरी ओळख क्रमांक, प्रकल्पाचा तांत्रिक तपशील आणि स्थानिक मंजुरीपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्रता व निकष काय ? योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदाराकडे जमिनीची मालकी किंवा जमीन भाडेपट्ट्यावर घेतल्याचा पुरावा असणे आवश्यक आहे.

या योजनेचा लाभ आता केवळ संस्थांपुरता मर्यादित नसून, वैयक्तिक शेतकऱ्यांनाही थेट लाभ मिळणार आहे. शेतकऱ्यांना जास्तीत जास्त ९. ९० लाख रुपयांपर्यंत अनुदान उपलब्ध होणार आहे.

**शेतकऱ्यांना कोणकोणत्या बाबींसाठी मिळते अनुदान ?**

तेलबिया प्रक्रिया युनिट, लहान व मध्यम प्लांट स्थापन करणे, तेलघाणा केंद्र उभारणे, गोदाम व साठवण सुविधा आणि काढणीपश्चात उपयुक्त उपकरणे आदींसाठी अनुदान मिळणार आहे. तेलबिया प्रक्रिया युनिट, प्लांट, तेलघाणा आणि गोदामांसाठी प्रकल्प खर्चाच्या ३३ टक्के किंवा जास्तीत जास्त 9.90 लाख रुपयांपर्यंत अनुदान उपलब्ध आहे. देशात तेलबिया पिकांचे उत्पादन वाढवणे आणि आयातीवर अवलंबित्व कमी करणे, हा मुख्य उद्देश या अभियानामागे ठेवण्यात आला आहे.

## निलंबनाचा बनावट आदेश प्रकरण

# अमळनेर गटविकास अधिकारी, जि. प. सीईओंची फसवणूक!

## पैलाडच्या एकावर अमळनेर पोलिसात गुन्हा दाखल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : निलंबनाचा बनावट आदेश तयार करून गटविकास अधिकारी व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची फसवणूक झाल्याचे निदर्शनास आले आहे. याप्रकरणी योगेश मोहन पवार (रा. पैलाड) याविरूद्ध शुक्रवार, दि. २३ जानेवारी रोजी येथील पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे.

पोलिसांनी सांगितले, की योगेश पवार याने तालुक्यातील कुऱ्हे बुद्रुक व कुऱ्हे खुर्द येथील ग्रापमपंचायत अधिकारी संगीता अशोक चौधरी यांच्याविरुद्ध १३ फेब्रुवारी व १८ फेब्रुवारी २०२५ रोजी तक्रारी अर्ज दाखल केला होता. त्यावर विस्तार अधिकारी सुरेश कठळे यांनी चौकशी केली होती. त्यांनतर संगीता चौधरी यांना नोटीस देऊन खुलासाही मागविण्यात आला होता. यापूर्वी योगेश पवार याने विविध माहितीचे अधिकारात अर्ज टाकल्याने त्यांना उत्तर देताना गटविकास अधिकऱ्यांच्या सह्यांचे अनेक पत्र जोडले आहेत. विस्तार अधिकारी सुरेश कठळे यांनी चौकशी करून अभिप्राय व अहवाल सादर केला होता. त्यात संगीता चौधरी यांच्या निलंबनाचा कुठलाही आदेश नव्हता. मात्र, योगेश मोहन पवार याने पंचायत समितीचे बोधचिन्ह व शिक्का वापरला होता. गटविकास अधिकारी यांची स्वाक्षरी स्कॅन करून संगीता चौधरी यांचा निलंबन आदेश तयार केला होता. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे लक्षवेधी म्हणून ११ जून रोजीचा तक्रार अर्जासह बनावट आदेश १३ जून रोजी सादर केला होता.

याबाबत जिल्हा परिषदेच्या मुख्याधिकारी यांनी १४ जून रोजी व्हाट्सएपने गटविकास अधिकाऱ्यांना सूचना दिल्या होत्या. त्यानंतर सर्व प्रकार उघडकीस आला. योगेश पवार याने मुख्य कार्यकारी अधिकारी आणि गटविकास अधिकारी यांची फसवणूक केल्याप्रकरणी गटविकास अधिकारी एन. आर. पाटील यांनी अमळनेर पोलीस ठाण्यात योगेश पवार याविरुद्ध भारतीय न्यायसंहिता ३१८ (२), ३३६ (३), ३३६ (४), ३४० (२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक समाधान गायकवाड तपास करीत आहेत.

# प्रताप महाविद्यालयात निबंध लेखन स्पर्धा

## लोकशाही मुल्ये, मतदान जनजागृती; ७० विद्यार्थ्यांचा सहभाग

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील प्रताप महाविद्यालयातील मराठी विभागातर्फे मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचे निमित्त व राष्ट्रीय मतदारदिनानिमित्त गुरुवार, दि. २२ जानेवारी रोजी सकाळी सीसीएमसीच्या हॉलमध्ये निबंध स्पर्धा झाल्या. यात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. महाविद्यालयातील विविध ज्ञानशाखांतील सुमारे ७० विद्यार्थी यात सहभागी झाले होते.



*अमळनेर : प्रताप महाविद्यालयात निबंध लेखन स्पर्धेत परीक्षण करताना डॉ. ज्ञानेश्वर कांबळे, प्रा. सागर सैंदाणे व प्रा. तुषार पाटील.*

विद्यार्थ्यांमध्ये मतदानाबाबत जनजागृती निर्माण करणे, लोकशाही मूल्यांचे महत्त्व अधोरेखित करणे व मतदानाच्या अधिकाराचे आणि कर्तव्याचे महत्त्व पटवून देणे हा स्पर्धेचा मुख्य उद्देश होता. 'जागरूक मतदार, सक्षम लोकशाही', 'एका मतदाराचे आत्मवृत्त', 'एका मताचे महत्त्व', 'आजचे राजकारण आणि मतदार', 'मतदारापुढील आव्हाने', 'सशक्त राष्ट्र निर्मितीसाठी मतदाराची भूमिका' आदी विषयांवर विद्यार्थ्यांनी निबंध लेखन केले.

या स्पर्धेत रोशनी रवींद्र सोनार हिने प्रथम, साक्षी रवींद्र पाटील हिने द्वितीय तर लखन जयवंत नेरकर याने तृतीय क्रमांक पटकावला. रमा संजय चव्हाण, दिशा नितीन पाटील आणि रोहिणी उत्तमगीर गोसावी हे उत्तेजनार्थ बक्षीसाचे मानकरी ठरले. प्रा. सागर सैंदाणे आणि प्रा. तुषार पाटील यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. एच. डी. जाधव यांचे मार्गदर्शन लाभले. सीसीएमसीचे संचालक डॉ. विजय तूंटे, मराठी विभाग प्रमुख डॉ. ज्ञानेश्वर कांबळे, डॉ. रमेश माने, डॉ. विलास गावित, प्रा. सागर सैंदाणे आणि प्रा. तुषार पाटील व प्रा. गोपाळ बडगुजर आदींनी परिश्रम घेतले.

# हिंदी अध्यापक मंडळ निबंध स्पर्धेचे बक्षीस वितरण

## अमळनेर तालुक्यातील ३ हजार विद्यार्थ्यांचा सहभाग; गुणवतांचा गौरव

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील हिंदी अध्यापक मंडळ व युनियन बँक ऑफ इंडिया यांच्यातर्फे झालेल्या तालुकास्तरीय राष्ट्रभाषा हिंदी निबंध स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा शुक्रवार, दि. २३ जानेवारी रोजी पूज्य साने गुरुजी माध्यमिक पतपेढीत झाला. तालुक्यातील तीन हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग नोंदविला. (पान ३ वर..)



*अमळनेर : निवृत्त शिक्षक एस. एन. पाटील यांना सपत्नीक जीवनगौरव पुरस्कार प्रदान करताना संदीप घोरपडे, सौ. वसुंधराताई लांडगे व मान्यवर.*

# अमळनेरला आज रथसप्तमीनिमित्त कार्यक्रम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील श्री सूर्यनारायण सेवा परिवार व श्री स्वामी समर्थ अध्यात्मिक ट्रस्टतर्फे रविवार, दि. २५ जानेवारी रोजी सकाळी मराठा मंगल कार्यालयात सूर्यनारायण जयंती व रथसप्तमीनिमित्त विविध कार्यक्रम होणार आहेत.

सकाळी १० वाजता श्री सूर्यनारायण पूजन व यज्ञ, सकाळी ११ वाजता सामूहिक सूर्य उपासना व अध्यात्मिक मार्गदर्शन, तर दुपारी १२ वाजता नैवेद्य आरती होईल. शहरासह तालुक्यातील भाविकांनी कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन श्री सूर्यनारायण सेवा परिवार व श्री स्वामी समर्थ अध्यात्मिक ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे. दरम्यान, सूर्यनारायण परिवाराचे हे उपक्रमाचे वीसावे वर्ष आहे.

## दिनविशेष

२५ जानेवारी

- आंतरराष्ट्रीय शिक्षण दिन
- कोलकाता येथे दक्षिण आशियातील पहिले विद्यापीठ स्थापन झाले.
- भारताच्या संविधानावर स्वाक्षरी झाली
- इंदिरा गांधी यांनी भारताच्या तिसऱ्या पंतप्रधान म्हणून शपथ घेतली.
- हंसा वाडकर मराठी हिंदी चित्रपट अभिनेत्री यांचा जन्म.
- डॉ. होमी जहांगीर भाभा भारतीय भौतिकशास्त्रज्ञ यांचे निधन.

## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...! जय स्वदेशी...!!

## लोकमान्य विद्यालयात स्नेहसंमेलन

# विद्यार्थ्यांच्या कलाविष्काराने जिंकली उपस्थितांची मने

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : लोकमान्य शिक्षण मंडळ संचलित बाल विकास मंदिर, नवीन मराठी शाळा व लोकमान्य विद्यालयाचे स्नेहसंमेलन गुरुवार, दि. २२ जानेवारी रोजी उत्साहात झाले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कलाविष्काराने उपस्थितांची मने जिंकली.

प्रा. डी. डी. पाटील अध्यक्षस्थानी होते. डॉ. पंकज महाजन व डॉ. सौ. हर्षदा महाजन, शाळा समितीचे चेअरमन प्रा. डॉ. पी. जे. जोशी, नवीन मराठी शाळेचे मुख्याध्यापक अतुल भोई, लोकमान्य विद्यालयाचे मुख्याध्यापक जे. के. चौधरी, बालविकास मंदिराच्या मुख्याध्यापिका अनिता वैद्य आदी व्यासपीठावर होते. मुख्याध्यापकपदी अतुल भोई यांची नियुक्ती झाल्याबद्दल संस्थेतर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. लोकमान्य विद्यालयाचे चेअरमन प्रा. डॉ. पी. जे. जोशी यांना सूर्योदय जीवनगौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. नवीन मराठी शाळेचे ज्येष्ठ उपशिक्षक मकरंद निळे व जेष्ठ उपशिक्षिका रुपाली अभिषेक पांडे यांचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांनी नृत्याविष्कार, सामाजिक व ऐतिहासिक नाटिका सादर केल्या. नवीन मराठी शाळेचे उपशिक्षक संदीप सिसोदे यांनी अध्यक्षांचा, तर उपशिक्षक उज्वल मार्कंडेय यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला.



*अमळनेर : स्नेहसंमेलनात छत्रपती शिवराय व अफजल खान यांच्या भेटीची नाटिका सादर करताना विद्यार्थी.*



# राजा कृष्णदेवराय विजयनगरसाठी सुवर्णकाळ!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सोळाव्या शतकातील राजा कृष्णदेवरायाचा राज्यकाल हा विजयनगरचा सुवर्णकाळ समजला जातो. कृष्णदेवरायाचे आयुष्य सुरस आणि चमत्कारिक कथांनी भरलेले आहे. कृष्णदेवरायाचा जन्म पण एका विचित्र घटनेतून झाला होता.एका संध्याकाळी विजयनगरचा सम्राट महालाच्या खिडकीतून आकाशाकडे बघत होता. तेव्हा त्याच्या डोळ्यासमोरच एक तारा निखळून खाली पडला. हा नैसर्गिक चमत्कार बघितल्यावर त्याने अनेक ज्योतिषांना ताबडतोब आमंत्रित केले. सगळ्या ज्योतिषांचे असे मत होते की असा तारा निखळून पडल्यावर जर सम्राटाने स्त्रीसंग केला,तर जन्माला येणारे मूल ताऱ्यांसारखेच अलौकिक असेल.नेमकी याचवेळी त्याची महाराणी शय्यागृहात वेळेत पोहोचू शकली नाही.तेवढ्यात त्याचे लक्ष एका समया प्रज्वलित करणाऱ्या दासीकडे म्हणजे नगंबाकडे गेले.त्याने तिच्यासोबत संग केला.या शरीरसंबंधातून जन्माला आलेले मूल म्हणजे कृष्णदेवराय.

आता या घटनेत काही ऐतिहासिक सत्य आहे, तर काही असत्य आहे. ते पण आपण बघूया. कृष्णदेवरायाच्या आईचे नाव नगंबा होते. त्याची आई तुळूवा जातीची होती. सम्राट दक्षिण कर्नाटकातला होता आणि नगंबा उत्तर कर्नाटकातून होती. दक्षिण आणि उत्तर कर्नाटकात काही सांस्कृतिक भेद आहेत. तूळूवा (म्हणजे तुळू बोलणारे ) हा राजवंश समजला जात नव्हता. या सगळ्या ऐतिहासिक घटना बरोबर आहेत. पण तारा निखळल्याचा संदर्भ काल्पनिक असावा. आणखी एक ऐतिहासिक सामाजिक सत्य या प्रसंगातून कळते ते असे, की त्या काळातही स्त्री ही उपभोग्य वस्तूच समजले जायचे. पण झाले हे असे आणि कृष्णदेवरायाचा जन्म झाला.

दासीपुत्र कृष्णदेवराय विजयनगरचा सम्राट कसा झाला? १५०९ मध्ये कृष्णदेवरायाचे सिंहासनावर बसला. पण हा ही एक चमत्कारच होता. त्याचे झाले असे, की तो सिंहासनावर बसण्याच्या वयात असतानाच त्यावेळेचा सम्राट वीरनरसिंहराय मृत्युशय्येवर होता. सम्राट वीरनरसिंहराय हा कृष्णदेवरायाचा सावत्र भाऊ. वीरनरसिंहराय सम्राटाच्या वंशावळीत जन्माला आलेला होता तर कृष्णदेवराय मात्र सम्राटाला एका दासीपासून झालेला होता. दासीपुत्र असल्याने त्याचा सिंहासनावर अधिकार नव्हता. मृत्युशय्येवर असलेल्या वीरनरसिंहाच्या मनात मात्र धाकधूक होती. त्याचा उत्तराधिकारी मुलगा आठ वर्षांचा होता. आपल्या पश्चात आपल्या मुलाला कृष्णदेवरायचा त्रास होऊ नये म्हणून सम्राटाने कृष्णदेवरायची हत्या करण्याचा आदेश दिला. या आज्ञेचे पालन



झाले आहे किंवा नाही, याची खात्री पटवून घेण्यासाठी त्याचे डोळे काढून आणायचा हुकूम दिला.

वीरनरसिंहरायाच्या पंतप्रधानाचे नाव होते सुलावा तिमारुसु. त्याच्या मनात मात्र काही वेगळेच होते. त्याने कृष्णदेवरायाला अज्ञातवासात पाठविले आणि एका शेळीचा खातमा करून तिचे डोळे वीरनरसिंहरायला दाखवले. यानंतर काही दिवसांतच सम्राटाचा मृत्यू झाला. कृष्णदेवराय अज्ञातवासातून बाहेर आला आणि विजयनगरचा सम्राट झाला. शेळी गेली जीवानिशी आणि सम्राट झाला कृष्णदेवराय.

ज्याकाळी बाबर उत्तरेत मुघल साम्राज्याची निर्मिती करत होता त्याकाळात कृष्णदेवराय आपले विजयनगरचे अवाढव्य राज्य राखून होता. कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि तमिळनाडू अशा दक्षिणेच्या ३ प्रमुख राज्यांमध्ये कृष्णदेवरायाची सत्ता होती. या तिन्ही राज्यांमध्ये कृष्णदेवरायाला मान होता. तेथील जनतेने त्याला बहाल केलेली पदे पाहा. कन्नड राज्य राम रमणा (कर्नाटक साम्राज्याचा स्वामी), आंध्र प्रदेश : आंध्र भोज (तेलगू साहित्याचे भोज) आणि मुरू रायरा गंडा (३ राजांचा राजा).


पेस, नुनेझ आणि बार्बोसा या त्या काळातील महत्त्वाच्या परदेशी प्रवाशांनी कृष्णदेवराय हयात असताना विजयनगर साम्राज्याला भेट दिली होती. त्यांच्या प्रवासवर्णनात नमूद केल्याप्रमाणे कृष्णदेवराय हा परदेशी प्रवाशांना मान देत असे. पण न्यायनिवाड्यात तो तितकाच क्रूर होता. त्याने रोजच्या व्यायामातून चांगले शरीर कमावले होते. व्यायामाकडे तो विशेष लक्ष द्यायचा. एक चांगला प्रशासक आणि कुशल सेनानी असेच त्याचे वर्णन वाचायला मिळते. असे म्हणतात, की तो युद्धात नेहमी अग्रस्थानी असायचा आणि युद्धात जखमी झालेल्या वीरांना तो स्वतः भेटायला जायचा. विजयनगरच्या साम्राज्याची भरभराट होण्यामागे एवढे एकच कारण नव्हते. राज्य सुरळीत चालविण्यासाठी जे प्रधानमंडळ लागते त्याची पहिल्यांदा स्थापना कृष्णदेवरायाने केली. तिमारुसु हा त्यांच्यातील प्रमुख होता.

जरी कृष्णदेवरायाची कारकीर्द साम्राज्याचा सुवर्णकाळ मानली जात असली, तरी ती फक्त वीसच वर्षांची होती. या वीस वर्षांच्या अधिपत्यात पंतप्रधान तिमारुसुचा मोठा वाटा होता. पण दोघांच्याही आयुष्याचा अंत मात्र फारच विपरीत झाला. कृष्णदेवरायाने त्याच्या राजपुत्राला गादीचा वारस नेमले. पण राजपुत्र अल्पायुषी ठरला. राजपुत्रावर विषप्रयोग झाल्याने व्यथित कृष्णदेवरायाने पंतप्रधान तिमारुसुवर संशय घेतला. तिमारुसुचे डोळे खुडण्यात आले. काही दिवसांतच असा तपास लागला, की पंतप्रधान तिमारुसुचा यात काही दोष नव्हता. राजपुत्राच्या खुनाचा कट ओरिसाच्या राजघराण्याने घडवून आणला होता. तिमारुसुची तुरुंगातून मुक्तता करण्यात आली. तिमारुसुने कृष्णदेवरायाकडून काहीही मदत घेण्याचे नाकारले. तो तिरुपतीला निघून गेला. तेथेच त्याच्या आयुष्याचा शेवट झाला. काही दिवसांतच कृष्णदेवरायाचे निधन झाले.

दैवाचे वळण असे असते. शेळीचे डोळे दाखवून ज्या तिमारुसुने कृष्णदेवरायाचे प्राण वाचवले त्याच कृष्णदेवरायाने तिमारुसुचे डोळे काढून त्याचे आयुष्य संपविले.

# क्रिकेटपेक्षा ॲक्टिंग कठीण

## रवींद्र जडेजा असे का म्हणाला?



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

क्रिकेटपेक्षा ॲक्टिंग कठीण असल्याचे भारताचा अष्टपैलू रवींद्र जडेजाने एका कार्यक्रमात सांगितले. यावेळी यष्टीरक्षक रिषभ पंत उपस्थित होता. पंत आणि जडेजा यांची एसबीआय लाइफ इन्शुरन्सचे ब्रँड ॲम्बेसडर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या कंपनीच्या जाहिरातीमध्ये दोघांनी जॉली व पॉलीच्या भूमिका साकारल्या आहेत.

ब्रँड ॲम्बेसडर झाल्याचा आनंद आहे. मात्र जाहिरातीमध्ये काम करण्याचे दडपण होते. संवाद (डायलॉग) बोलताना खूप तारांबळ उडाली, असे पॉल साकारणाऱ्या जडेजाने सांगितले. भविष्यात ॲक्टिंग करण्याचा विचार आहे का, असे विचारले असता माझ्याकडे अजून खूप क्रिकेट शिल्लक आहे. त्यामुळे सध्या क्रिकेटवर लक्ष केंद्रित केले आहे, असे तो म्हणाला.

जॉली साकारणाऱ्या पंतने जाहिरात शूटिंग दरम्यानची जडेजासोबतची केमिस्ट्री सांगितली. जडेजा हा वरवर सीरियस वाटत असला, तरी अजिबात गंभीर नाही. क्रिकेट असो किंवा अन्य कुठलेही काम, तुम्हाला प्रचंड मेहनत करावी लागते. प्रत्येक काम किंवा घटना तुम्हाला खूप काही शिकवून जाते. मी सुद्धा ॲक्टिंगचा आनंद लुटताना खूप काही शिकण्याचा प्रयत्न केला.

# नौ बेटियों के बाद महिला ने बेटे को दिया जन्म

## परिवार में १२ बहनों को मिला भाई; पिता ने नाम रखा दिलखुश

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जींद के उचाना कलां में सुरेंद्र और रीतू के परिवार में नौ बेटियों के बाद बेटे दिलखुश का जन्म हुआ है। इस खबर से परिवार में खुशी का ठिकाना नहीं रहा, क्योंकि वे लंबे समय से बेटे की कामना कर रहे थे। सुरेंद्र के भाई की तीन बेटियों को मिलाकर अब कुल १२ बहनों को भाई मिल गया है। परिवार ने इस खुशी को बयान से परे बताया है।

संवाद सूत्र, उचाना कलां (जींद)। जिले के उचाना कलां में सुरेंद्र के परिवार की खुशी का उस समय ठिकाना नहीं रहा, जब उन्हें सूचना मिली कि नौ बेटियों के बाद बेटे ने जन्म लिया है। नागरिक अस्पताल में करीब चार बजे गर्भवती रीतू पहुंची। रीतू को पहले नौ बेटियां हैं। ऐसे में सभी भगवान से दुआ कर रहे थे कि इस बार बेटा हो, ताकि नौ बेटियों को भाई मिले। सुरेंद्र के दूसरे भाई के भी तीन बेटी हैं, उनके भी भाई नहीं है। ऐसे में १२ बहनों को भाई मिला है। पिता सुरेंद्र ने कहा कि भगवान की कृपा से नौ लड़कियों के बाद बेटा हुआ है। जब भी बेटी होती, तो सब कहते थे भगवान बेटा दे इसको। भगवान की कृपा से बेटा हुआ है, जिससे सभी को खुशी हुई है। बेटे का नाम दिलखुश रखा है। इस तरह से नौ बेटियों के बाद बेटा हुआ है, बेटियों को भाई मिल गया। दो लड़कियों की शादी पिछले साल नवंबर में हुई थी। सबसे छोटी बेटी की



उम्र तीन साल है। सबसे बड़ी बेटी की उम्र २१ साल है।

### परिवार के लोगों में खुशी

कल्पना, आरती, भारती, खुशी, मानसू, रजनी, रजीव, काफी, माफी बेटियों के नाम हैं। मां रीतू ने कहा कि भगवान ने नौ बेटियों के बाद बेटा दिया है। २४ साल शादी को हो चुके हैं। मौसी वीना ने बताया कि बेटा होने पर मौसी व मामा सभी को खुशी हुई है। बहुत खुशी है। चचेरी बहन कल्पना ने कहा कि बहुत खुश हैं। २३ साल के बाद हमारे घर में छोटा बाबू आया है। बहुत खुश हैं, जिसको बयां नहीं कर सकते हैं। मेरी चाची को बेटा हुआ है। मौसी वीना ने कहा कि आज सारी दुनिया की खुशी हमें मिल गई है। नौ बेटियों के बाद बेटा हुआ है। मेरे ताऊ के तीन बेटे थे। बड़ा भाई गुजर चुका है, जिसके तीन बेटी हैं। उसके भी कोई बेटा नहीं है। अब १२ बेटियों को भाई मिल गया है। सगी बहनें नौ हैं, तीन ताऊ की बेटी हैं। परिवार की सदस्य प्रवीण देवी ने कहा कि डिलीवरी सही हुई है। एक बार बीपी बढ़ गया था, लेकिन बाद में नॉर्मल हो गया। पूरा परिवार खुश है।

### नागरिक अस्पताल में दिया बेटे को जन्म

डॉ. योगेश शर्मा ने बताया कि शाम चार बजे के करीब महिला रीतू आई थी, जिसको डिलीवरी होनी थी। इसकी पहले नौ डिलीवरी हो चुकी है। सब बेटियां थीं। १० वां बच्चा हुआ है, जो लड़का हुआ है। सरकार द्वारा कई सुविधाएं दी हैं। नागरिक अस्पताल उचाना ने नई उपलब्धि प्राप्त की। रीतू को पहले नौ बेटियां थी, उनको १० वां बच्चा बेटा हुआ है।

### दो सप्ताह पहले भी आया था ऐसा मामला

करीब दो सप्ताह पहले भी उचाना में एक महिला की डिलीवरी हुई थी। फतेहाबाद जिले के गांव ढाणी भोजराज की रहने वाली महिला सुनीता ने १० बेटियों के बाद बेटे को जन्म दिया था। उस लड़के का नाम भी दिलखुश रखा गया था। परिवार ने मिठाइयां बांटी थी।

# आठवण खटावच्या कॅलेंडरची..!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जानेवारी महिना आला, की खटावच्या कॅलेंडरची आठवण करायलाच हवी. एकेकाळी गोल साडी नेसून-सायकलवरून नोकरीला जाणारी बाई हे सामाजिक स्थित्यंतराचे मोठे वळण होते. त्या काळी मुलगी गोल साडी नेसते, या कारणास्तव लग्ने मोडली आहेत. गोल साडी म्हणजे पाचवारी साडी. नऊवारी ते पाचवारी हे सामाजिक स्थित्यंतराचे माप आहे. नंतर सुरू झालेल्या बाजारपेठेतील खटावची वायल म्हणजे एक लँडमार्क -वायल म्हणजे नव्या युगाची साडी. वायल म्हणजे व्हॉईल फेब्रिक. इंग्रजीत ज्याला वर्किंग वुमन्स अटायर म्हणता येईल अशी साडी. नोकरीसाठी बाहेर पडणाऱ्या स्त्रीला डोळ्यासमोर ठेवून बनवलेली साडी. वायलची साडी कधी आटायची नाही. बाजारात मिळणाऱ्या साड्या थोड्याफार चोर पन्ह्याच्या असतात. खटावच्या वायलच्या पन्ह्यात चोरी नसायची. उंच बाईलाही हा पन्हा पुरेसा असायचा. वायलसारख्या कपडय़ाला प्रिंटींग करण्यासाठी साधे रंग चालायचे नाहीत. रंग कमजोर पडला तर साडीवर ढग असल्यासारखा आभास व्हायचा. म्हणून सुरूवातीपासून आयात केले विदेशी रंगच वापरले जायचे. एक ब्रँड विकसित करताना जे जे म्हणून लागते ते सगळे खटावमध्ये व्हायचे. हॅपी मोमेंट्स ऑफ लाइफ शेअर विथ खटाव ही तेव्हाच्या अनेक टॅग लाइनपकी एक.

# ‘चमचेगिरी’..!

एकेकाळी आपल्या जेवणाच्या पद्धतीत चमचा वापरला जायचा नाही. हातानी- बोटांनी घास तोंडापर्यंत जायचा. नंतरच्या काळानुसार जेव्हा थाळीत चमचा आला तेव्हा ‘चमचेगिरी’ हा शब्द जन्माला आला. एकेकाळी खुषामत, खुषमस्करी, तोंडपुजेपणा, जी हुजुरी, चापलूसी या शब्दांची जागा आता चमचेगिरी या शब्दाने घेतली आहे. वापरात असलेले शब्द वर्तमान संस्कृतीनुसार कसे बदलत जातात याचा हा नमुना आहे.



# दररोज ७ कोटींचे दान करणारा उद्योगपती, गॅरेजमधून व्यवसायाची सुरूवात

**सक्सेस स्टोरी**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दररोज ७ कोटींचे दान करणाऱ्या भारतीय उद्योजकाने गॅरेजमधून कंपनीची सुरूवात केली आहे. आज भारतातील टॉपची आयटी कंपनी त्यांनी उभारली आहे.
देशातील एका यशस्वी उद्योजकाने १९७६ मध्ये एका छोट्या गॅरेजमधून कंपनीची स्थापना केली. आज ही भारतातील एक अग्रगण्य आयटी कंपनी बनली आहे. ते केवळ यशस्वी उद्योगपतीच नाहीत, तर समाजसेवेच्या क्षेत्रातही मोठे दानशूर म्हणून ओळखले जातात. ते दररोज सुमारे ७.४ कोटी रुपयांचे दान करतात.

### व्यवसायाला सुरूवात

शिव नादर यांचा जन्म १४ जुलै १९४५ रोजी तमिळनाडूतील तिरुचिरापल्ली जिल्ह्यात झाला. अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी डीसीएम ग्रुपमध्ये नोकरी केली. याच काळात त्यांच्या काही सहकाऱ्यांसोबत त्यांनी भारतात संगणक आणि इलेक्ट्रॉनिक्सच्या भविष्याबद्दल चर्चा केली आणि स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याचा निर्णय घेतला. १९७६ मध्ये नादर आणि त्यांच्या काही सहकारी अभियंत्यांनी दिल्लीत एका छोट्या गॅरेजमध्ये एचसीएलची स्थापना केली. सुरूवातीला कंपनीने संगणक हार्डवेअर आणि इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे बनविण्यावर लक्ष केंद्रित केले. भारतात संगणक तंत्रज्ञान लोकप्रिय करणे आणि देशातील तरुणांसाठी रोजगाराच्या नवीन संधी निर्माण करणे हा त्यांचा उद्देश होता.

### संघर्ष, आर्थक अडचण अन् व्यवसाय विस्तार

शिव नादर यांचा प्रवास सोपा नव्हता. सुरूवातीच्या काळात त्यांना आर्थिक अडचणी, तांत्रिक समस्या आणि बाजारातील स्पर्धेचा सामना करावा लागला. परंतु नादर यांची दूरदृष्टी आणि सतत नवनवीन शोध घेण्याची इच्छा यामुळे एचसीएल एक छोटी स्टार्टअप कंपनी ते भारतातील अग्रगण्य आयटी कंपनी बनली. तंत्रज्ञानाचा वापर लोकांचे जीवन सुलभ करण्यासाठी व्हावा, असे त्यांचे मत होते. १९८० आणि १९९० च्या दशकात एचसीएलने संगणक हार्डवेअरसोबतच सॉफ्टवेअर आणि आयटी सेवांमध्येही विस्तार केला. कंपनीने हळूहळू आंतरराष्ट्रीय स्तरावर पाऊल ठेवले आणि अमेरिका, युरोप आणि आशियातील अनेक देशांमध्ये आपल्या शाखा उघडल्या.

**आज उभारली भारतातील टॉपची आयटी कंपनी**


आज एचसीएल टेक्नॉलॉजीज जगातील सुमारे साठ देशांमध्ये कार्यरत आहे. कंपनीत दोन लाखांहून अधिक कर्मचारी कार्यरत आहेत. कंपनी क्लाऊड कंप्युटिंग, सायबर सुरक्षा, डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन आणि एंटरप्राइज सॉफ्टवेअर यांसारख्या सेवांमध्ये आघाडीवर आहे.

### जगातील श्रीमंत व्यक्तींमध्ये स्थान

नादर यांनी २०२० मध्ये चेअरमन पदावरून पायउतार झाले. २०२० मध्ये त्यांनी आपली मुलगी रोशनी नादर मल्होत्रा यांना एचसीएलचे चेअरमन बनवले, त्या कंपनीच्या पहिल्या महिला चेअरमन ठरल्या. शिव नादर हे कंपनीचे चेअरमन एमेरिटस आणि स्ट्रॅटेजिक सल्लागार आहेत. फोर्ब्स रिअल-टाइम बिलियनेअर्स रँकिंगनुसार, शिव नादर यांची नेटवर्थ ३६.७ अब्ज डॉलर आहे. ज्यामुळे ते जगातील सर्वात श्रीमंत १०० व्यक्तींपैकी एक आहेत. सध्या एचसीएलचे मार्केट कॅप ४ लाख ६० हजार कोटी रुपये आहे.

### दररोज ७ कोटींचे दान

शिव नादर यांची कहाणी केवळ व्यवसायापुरती मर्यादित नाही. ते शिक्षण आणि समाजसेवेच्या क्षेत्रातही अत्यंत सक्रिय राहिले आहेत. शिव नादर फाउंडेशनच्या माध्यमातून त्यांनी देशभरात शाळा आणि विद्यापीठे स्थापन केली आहेत. भारतीय कॉर्पोरेट जगातील सर्वात मोठे परोपकारी आणि दानवीरांच्या यादीत अव्वल स्थान मिळविले आहे. नादर कुटुंबाने गेल्या वर्षी २७०० हून अधिक कोटी रुपयांचे दान दिले, म्हणजेच त्यांनी दररोज सरासरी ७.४ कोटी रुपयांचे दान दिले. शिव नादर यांना २००८ मध्ये पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा सन्मान त्यांना आयटी उद्योगातील योगदानासाठी आणि देशातील तरुणांना संधी देण्याच्या दृष्टिकोनासाठी मिळाला.



हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

पान १ वरून...

## हिंदी अध्यापक मंडळ निबंध स्पर्धेचे बक्षीस वितरण

ग्रामीण विभागातून लहान गटात ७ व मोठ्या गटातून ७ अशा १४ विद्यार्थ्यांना, तर शहरी विभागातून लहान गटात ५ व मोठ्या गटातून ५ अशा १० विद्यार्थ्यांना स्मृतिचिन्ह, मेडल व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. एरंडोल तालुक्यातील रवंजे व भडगाव तालुक्यातील गुढे येथील शाळांना विशेष सहभाग पुरस्कार देण्यात आला. कार्यक्रमात ग्रामीण ३८ व शहरी १२ अशा एकूण ५० शिक्षकांना कृतिशील हिंदी अध्यापक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

फाफोरे माध्यमिक विद्यालयाचे निवृत्त हिंदी शिक्षक एस. एन. पाटील यांना सपत्नीक जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी सौ. वसुंधराताई लांडगे (विश्वस्तपदी पुनर्निवड), प्रतिभा जाधव (महात्मा फुले जिल्हास्तरीय पुरस्कार) आणि ईश्वर महाजन (दर्पण २०२६ पुरस्कार) यांचाही विशेष सत्कार झाला. युनियन बँक ऑफ इंडियाचे मुख्य प्रबंधक मयूर पाटील, संदीप घोरपडे, सौ. वसुंधराताई लांडगे, एस. एन. पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आशिष शिंदे व प्रशांत वंजारी यांनी सूत्रसंचालन केले. योगेश्री पाटील यांनी आभार मानले. राजेंद्र पाटील, दिलीप पाटील, एन. आर. चौधरी, ईश्वर महाजन, प्रतिभा जाधव, मुनाफ तडवी, प्रदीप चौधरी, कविता मनोरे, प्रतिभा साबे, शशिकांत पवार, एस. बी. पाटील आदींनी सहकार्य केले.

# घ्या... या वर्षीच होणार तिसरे महायुद्ध !

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**




२०२६ चे सर्वांनी जल्लोषात स्वागत केले. या वर्षात गेल्या वर्षापेक्षा चांगल्या गोष्टी घडतील, असे अपेक्षित आहे. मात्र, यंदाच्या वर्षासाठी वर्तविण्यात आलेली भाकिते पाहिली तर पोटात गोळा उठल्याशिवाय राहणार नाही. यामध्ये भविष्यवेत्ते नॉस्ट्रार्डमस आणि बाबा वेंगा गांच्या भविष्यवाणींचा समावेश आहे. त्यातही नॉस्ट्राडॅमसने तर २०२६ मध्येच तिसरे महायुद्ध होणार अशी भविष्यवाणी करून ठेवली आहे. प्रसिद्ध फ्रेंच भविष्यवेत्ता मिशेल डी. नॉस्ट्राडॅमस यांनी २०२६ साठी अनेक भविष्यवाण्या केल्या होत्या. त्यांच्या बहुतांश भविष्यवाण्या आतापर्यंत खऱ्या ठरल्या आहेत. त्यांनी त्यांच्या 'लेस प्रोफेटीज' या पुस्तकात या भविष्यवाण्या केल्या होत्या.

नॉस्ट्रार्डमस यांचा जन्म १४ डिसेंबर १५०३ रोजी सेंट-रेमी या छोट्या फ्रेंच गावात झाला. १५६६ मध्ये त्यांचे निधन झाले. २०२६ साठी नॉस्ट्राडॅमस यांनी केलेल्या भविष्यवाण्या अत्यंत भयावह आहेत. जर त्या खऱ्या ठरल्या तर संपूर्ण जग उध्वस्त होईल. नॉस्ट्राडॅमस यांनी महायुद्धाची भविष्यवाणी केल्यामुळे संपूर्ण जग भयभीत झाले आहे. नॉस्ट्राडॅमस यांनी स्वित्झर्लंडमधील तिचीनो शहरात रक्ताचे पाट वाहतील, असे म्हटले आहे. हे शहर स्वित्झर्लंडच्या सर्वांत दक्षिणेकडील भागात आहे. येथे मोठ्या प्रमाणात जंगले, तलाव आणि हिमनद्या आहेत. या भविष्यवाणीत या ठिकाणाचा उल्लेख का आहे हे कोणालाही माहिती नाही.

### महिनोंमहिने चालेल महायुद्ध

नॉस्ट्राडॅमस यांच्या भाकितानुसार तिसऱ्या महायुद्धामुळे विनाश होऊ शकतो. हे युद्ध जगातील महासत्तांमध्ये असू शकते. ते सात महिने टिकू शकते. काही तज्ज्ञांचे मत आहे की, ही भविष्यवाणी २०२६ साठीच अत्यंत अचूक आहे. काही जण याला तिसऱ्या महायुद्धाचे संकेतदेखील मानतात. त्यात अमेरिका, चीन आणि रशियासह अनेक देशांचा उल्लेख आहे.

**सांगलीत संत निरंकारी सत्संग सोहळा**

# खानदेशातून सुमारे २ हजार भाविक विशेष रेल्वेने रवाना

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : सांगली येथे शनिवार, दि. २४ जानेवारी ते सोमवार, दि. २६ जानेवारी तीन दिवसीय ५९ निरंकारी संत सत्संग होत आहे. प. पू. सद्गुरू माता सुदीक्षाजी महाराज व निरंकारी राजपिता रमितजी यांच्या सानिध्यात हा सोहळा पार पडणार आहे. या पार्श्वभूमीवर जळगाव, धुळे व नंदुरबार या तिन्ही जिल्ह्यातून सुमारे दोन हजार भाविक सहभागी होणार आहेत. अमळनेर येथूनही सुमारे १०० भाविकांचा सहभाग आहे. शुक्रवार, दि. २३ जानेवारी रोजी जळगाव, भुसावळ, पाचोरा व चाळीसगाव येथून विशेष रेल्वेने भाविक रवाना झाले आहेत. केंद्रीय राज्यमंत्री रक्षाताई खडसे व खासदार स्मिताताई वाघ, आमदार राजूमामा भोळे यांनी रेल्वेस हिरवा झेंडा दाखवून भाविक रवाना झाले.

धुळे क्षेत्रीय प्रभारी हिरालाल पाटील, खासदार रक्षाताई खडसे, सौ. रजनीताई सावकारे, डीआरएम पूनित अग्रवाल, स्टेशन मास्तर श्री. भालेराव, भुसावळ शाखेचे मुखी सुरेश तलरेजा, संचालक रतन परदेशी, आबा पाटील भुसावळ येथे रेल्वेला हिरवा झेंडा दाखविला. खासदार स्मिताताई वाघ, आमदार राजूमामा भोळे, ब्रम्हज्ञान प्रचारक राजकुमार वाणी, संयोजक रमेशकुमार आहुजा, जळगाव महापालिकेचे नवनिर्वाचित नगरसेवक आदींनी जळगाव येथे रेल्वेला हिरवा झेंडा दाखविला. तसेच पाचोरा व चाळीसगाव रेल्वे स्थानकावर लोको पायलट यांचा सत्कार करण्यात आला. खानदेशातून सुमारे २ हजार भाविक या सोहळ्याचा लाभ घेणार आहेत.

सांगली शहरालगतच्या सांगलवाडी परिसरात सुमारे ४०० एकरांच्या विस्तीर्ण व भव्य मैदानावर हा सत्संग सोहळा आयोजीत करण्यात आला आहे. दररोज दुपारी अडीच वाजता मुख्य सत्संग होणार आहे. या सोहळ्यास देश-विदेशातील संत, वक्ते, गीतकार व कवी संबोधित करणार आहेत. रात्री ९ वाजता सद्गुरू माता सुदीक्षाजी महाराजांच्या प्रेरणादायी आशीर्वचनांनी समारोप होईल.

लाखो भाविकांच्या सोयीसाठी निवासी तंबू, भव्य लंगर व्यवस्था (सामूहिक भोजन), कॅन्टीन, औषधालय, सुरक्षा यंत्रणा, नियोजित वाहनतळ तसेच रेल्वे स्थानक व बस स्थानकांहून ये-जा करण्यासाठी आवश्यक वाहतूक व्यवस्था करण्यात आली आहे.


*जळगाव : संत निरंकारी सत्संग सोहळ्यानिमित्त रेल्वेला हिरवा झेंडा दाखवून भाविकांना रवाना करताना खासदार स्मिताताई वाघ, आमदार राजूमामा भोळै व उपस्थित मान्यवर.*

## मांजात अडकलेल्या वटवाघूळाला पक्षीमित्र जितेंद्र वाणींनी दिले जीवदान

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : येथील साने गुरुजी विद्यालयातील एका झाडावर मांजात अडकलेल्या वटवाघूळाची पक्षीमित्र जितेंद्र वाणी यांनी सुटका केली आहे. ही घटना गुरुवार, दि. २२ जानेवारी रोजी घडली होती. त्यांच्या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे. नायलॉन मांजा वापरू नये, असे आवाहन पक्षीमित्र श्री. वाणी यांनी केले आहे.

मुख्याध्यापक संजीव पाटील, शिपाई बाळासाहेब पाटील, संजय महाजन, पवन पाटील, श्री. कार्लेकर, राहुल पाटील, श्री. क्षीरसागर, स्वप्निल पाटील, योगेश मोरे, महेंद्र रामोशे यांना झाडावर नायलॉनच्या मांजात वटवाघूळ अडकल्याची माहिती मिळाली. त्यांनी पक्षीमित्र जितेंद्र वाणी यांना ही घटना कळविली. श्री. वाणी यांनी घटनासस्थळी तत्काळ धाव घेऊन वटवाघूळाची मांजातून सुटका केली. जखमी झालेल्या वटवाघुळावर उपचार करून सोडून देण्यात आले.

वटवाघूळ हा सस्तन प्राणी आहे. तो निशाचर आहे. रात्री सक्रिय राहणारा हा प्राणी अल्ट्रासोनिक ध्वनींच्या साहाय्याने शिकार शोधतो. या प्रक्रियेला इकोलोकेशन म्हणतात. दिवसा सूर्यप्रकाश सहन न झाल्याने तो झाडांवर उलटे लटकून विश्रांती घेतो. पर्यावरणाच्या दृष्टीने वटवाघूळ अत्यंत महत्त्वाचा प्राणी आहे. तो रात्री कोट्यवधी कीटकांचा नाश करून शेतीस फायदेशीर आहे. निसर्गाचा समतोल राखतो. काही प्रजाती फळे खातात व फुलांच्या परागणात मोलाची भूमिका बजावतात.

समाजात वटवाघुळाविषयी अनेक अंधश्रद्धा प्रचलित आहेत. घरात वटवाघूळ येणे किंवा वारंवार दिसणे हे अशुभ, वाद, आर्थिक हानी किंवा नकारात्मक ऊर्जेचे लक्षण मानले जाते. मात्र, याउलट काही संस्कृतींमध्ये वटवाघूळ हे परिवर्तन, नव्या सुरुवातीचे व पुनर्जन्माचे प्रतीक मानले जाते.

**(स्व.) बाळासाहेब ठाकरे जन्म शताब्दी जयंती!**

# शिवसेनेतर्फे अमळनेरला विविध सामाजिक उपक्रम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : हिंदूहृदय सम्राट (स्व.) बाळासाहेब ठाकरे जन्म शताब्दी जयंतीनिमित्त, नेताजी सुभाष चंद्रबोस जयंती व जगद्गुरू संतश्री तुकाराम जयंतीनिमित्त शिवसेनेतर्फे विविध उपक्रम राबवून अभिवादन करण्यात आले. यावेळी स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना पुस्तक वाटप झाले.

न्यू प्लाट परिसरातील (स्व.) बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकास माल्यार्पण करुन अभिवादन करण्यात आले. सायंकाळी महाराणा प्रताप चौकात जगद्गुरु संतश्री तुकाराम महाराज यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेस माल्यार्पण करण्यात आले. महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेसही पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉ. परिक्षीत बाविस्कर, शिवसेनेचे गट नेते पंकज चौधरी, बांधकाम सभापती साहेबराव पवार, पाणीपुरवठा सभापती कैलास पाटील, नगरसेवक श्रीराम चौधरी, गुलाब पाटील, नाविद शेख, सुयोग धनगर, दीपक चौगुले, बाळासाहेब संदानशिव, तुळशीराम हटकर, सूरज परदेशी, शिवसेना तालुकाप्रमुख सुरेश पाटील, युवासेना तालुकाप्रमुख गुणवंत पाटील, नगरसेविका अपूर्वा चौधरी, जालू चौधरी, सुनील तडवी, अविनाश जाधव, अरुण महाजन, दीपक चौधरी, भूषण कोळी, किरण गोसावी, हिराभाऊ पाटील, गुलाम नबी, राजू परदेशी, मराठा महासंघाचे मनोहर पाटील, राहुल कंजर, मनोज शिंगाणे, विलास कंखरे, राजा शेख, मिसबाह अली, जाकीर शेख, विपुल पाटील, सोनू चौधरी, स्वामी चौधरी, चेतन चौधरी, सनी चव्हाण, दीपक पाटील आदी उपस्थित होते.



*अमळनेर : (स्व.) बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन करताना माजी नरसेवक प्रताप शिंपी व प्रतापआबा मित्र परिवार सदस्य.*

### प्रतापआबा मित्र परिवारातर्फे अभिवादन

हिंदुहृदयसम्राट (स्व.) बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त प्रभाग १७मध्ये माजी नगरसेवक प्रतापआबा मित्रपरिवारातर्फे प्रतिमेस पुष्पहार अर्पण करूनअभिवादन करण्यात आले.

कैलास पाटील, अमोल चौधरी, किशोर पाटील, पवन चौधरी, प्रशांत पाटील, विकी पाटील, सोनू पाटील आदी उपस्थित होते. उपस्थितांनी बाळासाहेब ठाकरे यांच्या सामाजिक, राजकीय योगदानाची माहिती दिली. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त केला.


*अमळनेर : भगवा चौकात (स्व.) बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन करताना नगरसेवक साहेबराव पवार, पंकज चौधरी, तालुकाप्रमुख सुरेश पाटील व कार्यकर्ते.*

# ज्ञानेश्वरी कारलेकरचे भूगोल प्रज्ञाशोध परीक्षेत यश

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील लोकमान्य विद्यालयातील विद्यार्थिनी ज्ञानेश्वरी अरविंद कारलेकर हिने मुंबई येथील भूगोल अभ्यास व परीक्षा केंद्रातर्फे घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय 'भूगोल प्रज्ञाशोध' परीक्षेत दहावी गटात १०० पैकी ९४ गुण मिळवून घवघवी यश संपादन केले आहे. प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देवून तीचा गौरव करण्यात आला. लोकमान्य विद्यालयाच्या स्नेहसंमेलनातील क्रीडा तसेच विविध स्पर्धांमध्येही ज्ञानेश्वरीने प्रथम क्रमांक पटकावला आहे.



*अमळनेर : ज्ञानेश्वरी कारलेकरचा सत्कार करताना नगराध्यक्ष परीक्षित बाविस्कर. शेजारी विवेकानंद भांडारकर व मान्यवर.*

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम

सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे




## हळदी-कुंकू कार्यक्रमाची आज सांगता

भारतीय संस्कृतीत मकर संक्रांतीला सूर्य उत्तरायणात प्रवेश करतो. हा काळ अत्यंत शुभ मानला जातो. संक्रांतीपासून सुरू होणारे हळदी-कुंकवाचे कार्यक्रम रथसप्तमी (सूर्याचा जन्मदिवस) पर्यंत चालतात. या सोहळ्यामागे केवळ परंपरा नाही, तर अनेक आध्यात्मिक कारणे आहेत.



# रथसप्तमी : सूर्याच्या उत्तरायणाचे प्रतीक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

माघ शुद्ध सप्तमीला 'रथसप्तमी' असे म्हणतात. शास्त्रानुसार या दिवसाचे महत्त्व, पूजन विधी आणि उपासना खालीलप्रमाणे आहे.

### १) महत्त्व

रथसप्तमी हा दिवस म्हणजे सूर्याच्या रथाचे चाक उत्तर दिशेला वळते. म्हणजेच उत्तरायणाचे प्रतीक मानले जाते. या दिवशी सूर्याचा जन्म झाला असेही मानले जाते म्हणून याला 'सूर्य जयंती' असेही म्हणतात.

### २) रथसप्तमीचे पूजन कसे करावे?

सनातन संस्थेनुसार या दिवशी सूर्याची उपासना केल्याने आरोग्य आणि तेज प्राप्त होते. पूजनाच्या मुख्य पायऱ्या खालीलप्रमाणे आहेत:

**अंगणात रांगोळी**

घरासमोर सूर्याच्या रथाची रांगोळी काढावी. रथात मध्यभागी सूर्याची आकृती काढावी.

**क्षीर (दूध) आटवणे**

या दिवशी अंगणात शेणी पेटवून त्यावर मातीच्या पात्रात दूध तापत ठेवतात. ते दूध उतू जाऊ दिले जाते. दूध कोणत्या दिशेला उतू जाते, त्यावरून शुभ-अशुभ संकेत पाहिले जातात (उदा.- पूर्व किंवा उत्तर दिशेला दूध जाणे शुभ मानले जाते). त्या दुधात तांदूळ टाकून त्याचा प्रसाद (खीर) बनविला जातो.



**सूर्याला अर्घ्य देणे**

ताम्हणात पाणी घेऊन त्यात गंध, अक्षता आणि लाल फुले टाकून सूर्याच्या १२ नावांनी अर्घ्य द्यावे.

### ३) आरोग्यदायी स्नान

रथसप्तमीच्या दिवशी डोक्यावर आणि खांद्यावर रुईची पाने ठेवून स्नान करण्याची परंपरा आहे. रुईच्या पानांमध्ये सौर ऊर्जा खेचून घेण्याची शक्ती असते. असे स्नान केल्याने त्वचेचे विकार दूर होतात आणि वर्षभर आरोग्य चांगले राहते, असा भाव ठेवला जातो.

### ४) उपासना आणि मंत्र

या दिवशी सूर्याच्या उपासनेसाठी खालील कृती कराव्यात.

**सूर्यनमस्कार**

सूर्याच्या १२ नावांचा उच्चार करत सूर्यनमस्कार घालावेत.

**मंत्रजप**

'**ॐ सूर्याय नमः**' किंवा '**आदित्यहृदय स्तोत्राचे**' पठण करावे.

**गायत्री मंत्र**

ज्यांना शक्य आहे त्यांनी गायत्री मंत्राचा जप करावा.

### ५) रथसप्तमीचे आध्यात्मिक फळ

'**आरोग्यं भास्करादिच्छेत्।**' (आरोग्याची इच्छा सूर्याकडे करावी.)
सनातन संस्थेच्या मार्गदर्शनानुसार कोणत्याही सणाचा आध्यात्मिक लाभ करून घेण्यासाठी तो 'भावपूर्ण' साजरा करणे महत्त्वाचे आहे. सूर्याकडे 'बुद्धीला सत्प्रेरणा दे' अशी प्रार्थना केल्याने व्यक्तीची सात्त्विकता वाढते.

# सूर्य देव जयंती : आध्यात्मिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक वारसा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय सनातन परंपरेत सूर्याला केवळ एक ग्रह न मानता सृष्टीचा प्राणदाता मानले गेले आहे. जीवन, ऊर्जा, आरोग्य, कालगणना आणि ऋतूचक्र यांचा केंद्रबिंदू असलेल्या सूर्यदेवतेचा जन्मोत्सव म्हणजेच रथसप्तमी. माघ महिन्यातील शुक्ल पक्षातील सप्तमी तिथीला साजरा होणारा हा उत्सव सूर्य जयंती, माघ सप्तमी किंवा अचला सप्तमी या नावांनीही ओळखला जातो.



### रथसप्तमीचे धार्मिक महत्त्व

पुराणकथेनुसार या दिवशी सूर्यदेव आपल्या सात घोड्यांच्या रथावर आरूढ होऊन उत्तरायणाचा प्रवास प्रारंभ करतात. हे सात घोडे इंद्रधनुष्याचे सात रंग, आठवड्याचे सात दिवस तसेच मानवी शरीरातील सात चक्रांचे प्रतीक मानले जातात. रथसप्तमी ही मकर संक्रांतीनंतर येत असल्याने सूर्याची उष्णता आणि तेज वाढण्यास सुरूवात होते. त्यामुळे हा दिवस नवचैतन्याचा प्रारंभ मानला जातो. पौराणिक कथेनुसार राजा यशोवर्म्याच्या पुत्राला कुष्ठरोग झाला होता. त्याने रथसप्तमीच्या दिवशी विधिपूर्वक सूर्योपासना केल्याने तो रोगमुक्त झाला. त्यामुळे या दिवशी सूर्यस्नान, सूर्यनमस्कार आणि आदित्यहृदय स्तोत्र पठण यांना विशेष महत्त्व आहे.

### व्रत व पूजा पद्धती

रथसप्तमीच्या दिवशी पहाटे उठून स्नान करणे अत्यंत पुण्यदायी मानले जाते. अनेक ठिकाणी अर्काची पाने (रुईची पाने) डोक्यावर, खांद्यावर ठेवून स्नान करण्याची प्रथा आहे. यानंतर सूर्याला अर्घ्य अर्पण करून उपवास किंवा फलाहार केला जातो. घराघरांत सूर्यदेवतेची पूजा, नैवेद्य, कथा श्रवण आणि दानधर्म केला जातो.

### वैज्ञानिक दृष्टिकोन

रथसप्तमीचे महत्त्व केवळ धार्मिक नसून वैज्ञानिकही आहे. हिवाळ्यानंतर सूर्यकिरणांचा कोन बदलतो आणि शरीराला आवश्यक असलेली उष्णता व ऊर्जा मिळू लागते. या काळात सूर्यस्नान केल्याने व्हिटॅमिन डी मिळते, रोगप्रतिकारशक्ती वाढते आणि मानसिक स्वास्थ्य सुधारते. आपल्या पूर्वजांनी ऋतू परिवर्तनाशी सुसंगत असे सण आखून मानवी आरोग्याची काळजी घेतली होती, हे यावरून स्पष्ट होते.

### सांस्कृतिक परंपरा

भारताच्या विविध भागांत रथसप्तमी वेगवेगळ्या पद्धतीने साजरी केली जाते. दक्षिण भारतात, विशेषतः तिरुमला तिरुपती येथे भव्य रथोत्सवाचे आयोजन केले जाते. महाराष्ट्रातही काही मंदिरांमध्ये सूर्यदेवतेची विशेष पूजा, प्रवचने आणि धार्मिक कार्यक्रम आयोजित केले जातात.

### संदेश आणि आधुनिक काळातील उपयुक्तता

आजच्या धकाधकीच्या जीवनात आपण निसर्गापासून दुरावत चाललो आहोत. रथसप्तमीसारखे सण आपल्याला निसर्गाशी नाते जोडण्याची, आरोग्य जपण्याची आणि सकारात्मक जीवनदृष्टी अंगीकारण्याची शिकवण देतात. सूर्य हा केवळ आकाशातील तेजस्वी गोळा नसून तो जीवनाचा आधार आहे, ही जाणीव या उत्सवातून होते. रथसप्तमी म्हणजे श्रद्धा, विज्ञान आणि संस्कृती यांचा सुंदर संगम आहे. सूर्य जयंतीच्या निमित्ताने आपण सूर्योपासनेद्वारे शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक उन्नती साधूया आणि आपल्या समृद्ध परंपरेचा अभिमान बाळगूया.

# रथसप्तमी अर्थात सूर्य जयंती : दान-पुण्य करण्याचा दिवस

माघ शुक्ल सप्तमी दिवशी सूर्य देव प्रकट झाले होते. या दिवसाला रथसप्तमी अर्थात सूर्य जयंती म्हणूनही साजरा करतात. अशी मान्यता आहे की या दिवशी दान-पुण्य केल्याने चांगले फळ प्राप्त होते. सप्तमी तिथीच्या दिवशी रथसप्तमी हा उत्सव साजरा केला जातो. हा उत्सव वसंत पंचमीच्या दोन दिवसांनंतर येतो.



### कधी कराल रथसप्तमीचे व्रत

२०२६ या वर्षात रथसप्तमीचे पर्व रविवार, दि. २५ जानेवारी रोजी साजरे केले जाईल. या दिवसाला इतर नावांनीही ओळखले जाते. जसे- अचला सप्तमी, माघ सप्तमी, माघ जयंती, विधान सप्तमी, आरोग्य सप्तमी आणि सूर्य जयंती नावाने ओळखले जाते. पंचांगानुसार माघ महिन्याच्या शुक्ल पक्षाची सप्तमी तिथी २५ जानेवारी शनिवारच्या रात्री १२ वाजून ४० मिनिटांनी सुरू होईल. जी दुसऱ्या दिवशी म्हणजेच २५ जानेवारी रविवारच्या रात्री ११ वाजून १० मिनिटांपर्यंत राहील. असे मानले जाते, की याच तिथीला सूर्य देव ७ घोड्यांच्या रथावर स्वार होऊन प्रकट झाले होते. या दिवशी सिद्ध, साध्य, वर्धमान, आनंद आणि सर्वार्थसिद्धी नावाचे ५ शुभ योग दिवसभर राहतील. ज्यामुळे या सणाचे महत्त्व आणखी वाढले आहे.

### रथ सप्तमीचा शुभ मुहूर्त

स्नान मुहूर्त (अरुणोदय स्नान) : सकाळी ५ : २६ ते ७.१३ (सुमारे १ तास ४७ मिनिटे). हा काळ अत्यंत शुभ आहे. कारण यात स्नान केल्याने सर्व रोग दूर होतात.

### रथसप्तमीच्या दिवशी काय कराल?

१) सर्वांत आधी पहाटे उठून स्नान करून व्रत संकल्प करणे.

२) विधिविधानानुसार सूर्य देवांची पूजा करणे.

३) या दिवशी स्नान करून सूर्यदेवांना अर्घ्य दिल्याने आयु, आरोग्य आणि संपत्तीची प्राप्ती होते.

४) रथ सप्तमीच्या दिवशी दान-पुण्यचे महत्त्व आहे.

५) या दिवशी भगवान सूर्य देवांना प्रसन्न करण्यासाठी उपासना केली जाते.

६) मान्यतेनुसार या दिवशी सूर्य देव दिव्या प्रकाशासोबत अवतरित झाले होते.

७) कल्पवास करणाऱ्या भक्तांनी नदित दिवा प्रवाहित करण्यापूर्वी 'नमस्ते रुद्ररूपाय, रसानां पतये नमः। वरुणाय नमस्तेस्तु' या मंत्राचे उच्चारण करणे.

८) त्यानंतर सूर्य देवांची आरती करणे.

९) माघ महिन्याच्या शुक्ल पक्ष सप्तमीला अर्क सप्तमी, रथ आरोग्य सप्तमी, अचला सप्तमी, माघी सप्तमी, सूर्य जयंती, रथ सप्तमी और भानु सप्तमी म्हटले जाते. या दिवशी चांगले आरोग्य मिळावे म्हणून प्रार्थना केली जाते.

१०) रथ सप्तमी, आरोग्य, अचला सप्तमी या दिवशी मिठाचा प्रयोग करू नये.

११) या दिवशी फक्त एक वेळेस जेवण करावे.

१२) भगवान सूर्य देवांनी या दिवशी आपला प्रकाश प्रकाशित केला होता. म्हणून या दिवसाला सूर्य जयंतीही संबोधले जाते. या दिवशी सूर्य देवाचे मंत्र, पाठ, स्तोत्र वाचने पुण्यफलदायी मानले जाते.

### विवाहित महिलांसाठी हे खास का आहे?

हे व्रत महिलांसाठी, विशेषतः विवाहित महिलांसाठी, वरदानापेक्षा कमी नाही. असे मानले जाते, की

अखंड सौभाग्य : या दिवशी सूर्यदेवाची पूजा केल्याने वैवाहिक जीवनात आनंद मिळतो आणि पतीचे आयुष्य वाढते.

आरोग्य आणि सौंदर्य : सूर्याची किरणे सकारात्मक ऊर्जा प्रदान करतात. या दिवशी अंगणात दूध उकळण्याची परंपरा आहे, जे घरात समृद्धीचे प्रतीक मानले जाते

### काशी (वाराणसी) मध्ये रथसप्तमी कशी साजरी होते?

वाराणसी येथे रथसप्तमीला विशेष महत्त्व आहे. या दिवशी गंगा नदीत अरुणोदय काळात स्नान करणे अतिशय शुभ मानले जाते. हजारो भक्त गंगाघाटावर स्नान करून सूर्य देवाला अर्घ्य देतात. काशीतील सूर्यकुंड किंवा दशाश्वमेध घाट येथे मोठ्या प्रमाणात पूजा-अर्चा होते. येथे सूर्य मंदिरात विशेष पूजा आणि हवन केले जाते. काशीमध्ये या दिवशी सूर्य देवाच्या जन्माची कथा सांगितली जाते आणि दान-पुण्य केले जाते. काशीमध्ये रथसप्तमीला सूर्य जयंती म्हणूनही साजरे केले जाते.

## मना सज्जना...

# 'सदासर्वदा प्रीती रामी धरावी'

परम स्नेही मित्रहो,
समर्थ रामदास आणि प्रभू श्रीरामचंद्र यांचे स्मरण करून पुढे जाऊया.

**श्लोक १०**

**सदा सर्वदा प्रीती रामी धरावी।**
**दुःखाची स्वये सांडी जीवी करावी।**
**देह दुःख हे सुख मानीत जावे।**
**विवेके सदा स्वस्वरूपी भरावे॥ १० ॥**

**'सदासर्वदा प्रीती रामी धरावी'**
ही केवळ एक आज्ञा नाही, तर दुःखाने पिचलेल्या मनासाठी दिलेली आईसारखी मायेची हाक आहे. मन जेव्हा संसाराच्या ओझ्याखाली दबते तेव्हा समर्थ त्याला समजावून सांगतात. श्रीराम नामाच्या साधनेला घट्ट धर. कारण श्रीरामांजवळ धरले, की दुःखाला जागाच उरत नाही. आपण दुःखाला घाबरतो. ते येऊ नये म्हणून धडपडतो. पण दुःख आले, की मन नकळत देवाच्या दारी जाऊन बसते. तेव्हा कळते, की दुःख आपल्याला मोडायला नाही, तर जोडायला आलेले असते.
तुकाराम महाराज किती हळुवारपणे सांगतात-
**सुखात विसरू हरिनाम।**
**दुःखात आठवे राम॥**
सुखात आपण विसरतो, दुःखात मात्र राम आठवतो.
म्हणून समर्थ सांगतात-
**'देह दुःख हे सुख मानीत जावे'**
कारण देहाला झालेली वेदना, मनाला श्रीरामांकडे घेऊन जाते. आणि श्रीरामांच्या चरणी लीन झालेले मन मग स्वतःला विसरते. तेव्हाच खऱ्या अर्थाने सुखाचा शोध लागतो.
भगवान श्रीकृष्ण श्रीमद्‌भगवद्‌गीतेत म्हणतात-
**'इंद्रियाणां मनश्चास्मि'**
म्हणजे सर्वत्र इंद्रियांत मी मन आहे. जे अदृश्य परंतु सर्वत्र संचार करणारे अविनाशी असे. तुझं मन जिथे जिथे जाईल, तिथे तिथे मी असणार आहे. मन अशांत असेल, तर मीही दूर वाटेन. परंतु मन राम नामात विसावले, तर मी अगदी जवळ उभा आहे.
ज्ञानेश्वर माऊलींच्या शब्दांत-
**इंद्रियमाजी अकरावे।**
**मन हे ते मी जाणावे।**
**भूतामाजी स्वभावे।**
**चेतना ते मी॥**
मनात चेतना आहे आणि त्या चेतनेतच परमात्मा वास करतो. म्हणून समर्थ शेवटी सांगतात-
'विवेके सदा स्वस्वरूपी भरावे'
विवेक म्हणजे कठोरपणा नव्हे,
समर्थांची श्रीराम भक्ती अलौकिक आहे. ते मनाला सांगतात, की संसाराचा भार वाहताना प्रभू श्रीरामांच्या ठायी चित्त ठेवा. म्हणजे दुःखाचा भार वाटणार नाही. याकरिता सदैव नामस्मरण करावे. श्रीराम नामाचे विस्मरण कदापि होणार नाही म्हणून दक्षता घ्यावी. मनात सदैव श्रीरामांचे चिंतन असले, तर या चिंतनामुळे सर्व दुःखे, व्यथा या लयास जातात.
आपल्याला ठेच लागली, की आपल्या ओठावर आपसूकच 'आई' असे नाव येते. एखादी भीतीदायक गोष्ट घडली की 'बापरे' असा उद्गार निघतो. हे सारे सहज होते. त्याचप्रमाणे दुःखाचा प्रसंग आला, की आपल्याला 'देव' आठवतो. दुःखाच्या प्रसंगातून सुटका देखील देव करतो. परंतु त्यासाठी निस्सीम भावाने त्यांना शरण जाणे झाले पाहिजे. म्हणजेच दुःखाच्या कारणांनी आपल्याला देव आठवतो. तेव्हा दुःख हे देखील सुख मानावे. कारण त्यामुळेच देवांचे नाव घ्यावे लागते.



म्हणून संत आपल्याला नामस्मरण करायला सांगतात.
परमपूज्य गोंदवलेकर महाराज यांची एक रचना या आशयाची आहे ती आपण पाहूया-
**जेथे नाम तेथे श्रीराम। नामाशिवाय जो जो विश्वास।**
**ते ते अविश्वासाचे कारण आहे खास॥**
**नामाविण मानी सत्य। नाही त्याने जोडला भगवंत॥**
**नामाविण मानी जग। त्याचा होऊ देऊ नये विटाळ॥**
**नामाची जेथे मस्ती। तेथे रामाची वस्ती॥**
**याहून जे जे वाटले सुख। ते तेच दुःखाला कारण॥**
**देवळे सभामंडपे न येत कामा। ज्याने नाही ठेविले हृदयी श्रीरामा॥**
**श्रीराम करून घ्या आपुलासा। तोडा तोडा जन्ममरणाचा फासा॥**
**श्रीराम एक दाता। त्याचेवाचून नाही कोणी देता॥**
**नामाचे अनुसंधान। प्रपंचात सर्वांचे समाधान॥**
**जे जे होईल समाधानाचेच कारण।**
**श्रीरामास व्हावे अर्पण॥**
**मोह ममता देहाचा अभिमान।**
**हा संसाराचा पसारा जाण। तेथे ठेवू नये मन॥**
**नाही देहाला कष्ट देऊ। अनुसंधान न द्यावे बिघडू॥**
**नामात आहे समाधान। हा विश्वास ठेवावा पूर्ण॥**
**मी मागतसे एक दान। ते द्यावे तुम्ही सर्वांनी॥**
**नामापरते नका मानू सुख। श्रीरामापायी करून घ्यावे आपणास अर्पण॥**
**याहून नको मज काही। एवढी भीक घालावी सर्वांनी॥**
**व्यवहार लौकिक विषयाची आवड। हेच परमार्थाला मुख्य येई आड॥**
**त्यांना सारावे बाजूस। एक भजावे भगवंतास॥**
**नाही सत्य मानू जगी काही। श्रीरामांचा आसरा घ्यावा हृदयी॥**
**जोपर्यंत देहाचा संबंध। तोपर्यंत लौकिकाची चाड॥**
**प्रपंचाच्या थोडया सुखासाठी।**
**नाही अंतर देऊ जगजेठी॥**
**चार वेद सहा शास्त्रे। सर्व केल्या स्मृति पारायण।**
**तरी पण जोवरी मन नाही झाले स्थिर।**
**तोवर तेथे कोठे समाधान ?॥**
**सर्व शास्त्रांचे सार। एक भजावा रघुवीर॥**
**नामी ठेवावे लक्ष पूर्ण। तेणे होईल समाधान॥**
**नामाची धरावी कास। देहादिक प्रपंचात न व्हावे उदास।**
**हे सर्व साधे राखता अनुसंधान॥**
**आता करण्याचे उरले काही। हे किंचितही न आणावे मनी॥**
**मनाने व्हावे रामार्पण। सर्व सत्कर्म साधनांचा कळस जाण॥**
**चित्त ठेवावे श्रीरामापाशी। ध्यास असावा त्याचा अहर्निशी॥**
**देहाने नाही करता आले। मन श्रीरामापायी गुंतवले। श्रीरामाने त्याचे कल्याण केले॥**
**श्रीराम ठेवील त्यात समाधान। हेच खरे भक्तीचे लक्षण जाण॥**
**गुरूकडून घेतलेले नाम। पावन करील जगास।**
**हाच ठेवावा विश्वास। श्रीराम कृपा करील खास॥**
**देहाची स्थिती। कायम न राहे निश्चित॥**
**ते सांभाळणे आहे जरूर। न विसरता रघुवीर॥**
**श्रीरामा तुझ्याकरिता राहिलो। हा भाव ठेवावा निश्चित।शक्य तो स्मरावा रघुपति॥**
**श्रीरामचरणी लावावे मन। इतुके करावे तुम्ही थोडेफार। नाही करू दुसरी यातायात जाण॥**

**जय जय रघुवीर समर्थ!**

- भाऊसाहेब देशमुख, अमळनेर.
मो. : 94203 89541

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)